# खुली ई - निविदा सूचना

# ग्रामपंचायत विचुंबे

# ता.पनवेल जिल्हा.रायगड

यांचेकडील साहित्य पुरवठा कामांच्या ग्राग्रामनिधी २०२५-२६ अंतर्गत खालील कामांची निविदा योग्य त्या पुरवठादार ऑनलाईन निविदा मागवण्यात येत आहे.. सदर निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल..

| क्र | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| 1. | विचुंबे गावासाठी कचराकुंडी खरेदी करणे. | 8000 | 600 | 30 Days |

वरील कामाची निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांकापर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | 19/05/2026 | 04:00 Pm | 26/05/2026 | 12:00 Pm |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट मिळवण्याचा कालावधी | 19/05/2026 | 04:00 Pm | 26/05/2026 | 12:00 Pm |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | 19/05/2026 | 04:00 Pm | 26/05/2026 | 12:00 Pm |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | 28/05/2026 | 11:00 Am | | |

अटी व शर्ती

१. निविदेतील लघुत्तम दरकरार धारकाने साहित्याचा पुरवठा करणेस नकार दिल्यास बयाना रक्कम जप्त करण्यात येईल तसेच अशावेळी निविदेतील अनु. क्र. २ च्या दराचा विचार झाल्यास दराच्या तफावतीची रक्कम लघुत्तम अनु. क्र. १च्या निविदाधारकाचे त्याच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल. संबंधित लघुत्तम निविदा धारकाचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल व त्यास ३ वर्षापर्यंत ग्रामपंचायत विचुंबे यांचेकडून काम दिले जाणार नाही.

२. उपलब्ध तरतुदीचे आधीन राहून साहित्याचा पुरवठा आदेश देण्यात येतील निविदा सुचनेतील नमूद परिमाण संख्येत वाढ/घट होण्याची शक्यता आहे त्याबाबतचे आदेश तरतूद उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येतील.

३. पुरवठा दराने पुरवठा आदेश दिल्यापासून सन 25-26 पर्यंत पुरवठा करणे आवश्यक आहे मुदतीत पुरवठा न केल्यास नियमावलीनुसार पुरवठा न केलेल्या मालाच्या किमतीच्या प्रती दिन ०.५% प्रमाणे व १ लाखापेक्षा जास्त असल्यास कमाल मर्यादा ५% असेल.

४. निविदेतील तपशिलानुसार आयएसआय दर्जाचा मालाचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

५. ज्या पुरवठादाराची निविदा मंजूर होईल त्यांना या कार्यालयाचे वाटप तक्त्यानुसार व निविदा मधील नमूद साहित्याच्या तपशीलाप्रमाणे सर्व माल एकत्रित करून गठीत समितीच्या तपासणीअंती संपूर्ण पुरवठा आदेश सोबत दिलेल्या यादीप्रमाणे ग्रामपंचायत विचुंबे साहित्याचा माल पोहोच करावा लागेल.

६. पुरवठा करणेत येणाऱ्या साहित्यावर आर्थिक वर्ष या व (ग्रामपंचायत नाव)प्रिंट करणे आवश्यक आहे.

७. ग्रामपंचायत देईल त्या यादी प्रमाणे प्रत्येक ठिकाणी पोहोच करणे व पूर्व प्रस्थापित स्थितीत करून देणे बंधनकारक आहे व यात कोणतीही सबब चालणार नाही.

८. निविदा धारकाने निविदा भरून देणेसाठी दोन पाकीट पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.

९. साहित्य पुरवठ्याबाबत असमाधानकारक परिस्थिती आढळून आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास आपला करार रद्द करणेच तसेच सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार ग्रामपंचायत विचुंबे यांना राहील.

१०. राज्य शासन / केंद्र शासन किंवा जिल्हा परिषदेशी संबधित इसमास निविदा भरता येणार नाही.

११. कोणतीही सशर्त निविदा स्वीकारली जाणार नाही.

१२.साहित्याची तपासणी करताना साहित्यामध्ये दोष आढळल्यास ७ दिवसात निविदामधील तपशीलाप्रमाणे पुरवठा करणे बंधन कारक राहील. त्या विहित मुदतीत पुरवठा केल्या जाणाऱ्या साहित्याप्रकरणी प्रती दिन रु. ५००/- प्रमाणे दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येईल.

१३. निविदेतील मंजूर दर हे. 2025-26 पर्यंत विधीग्राह्य राहतील. तथापि सुधारित तरतुदींमुळे निविदा अंदाजित रक्कमेत वाढ झाल्यास निविदेतील लघुत्तम दराने पुरवठा करावा लागेल.

१४. सदर साहित्य पुरवठ्या संदर्भात न्यायालयीन वाद उद्भवल्यास न्यायालयीन ठिकाण हे विचुंबे राहील .

१५. मंजूर झालेल्या निविदा धारकाने स्विकृती पत्रानुसार. मुदतीत शासकीय नियमानुसार आवश्यक रकमेच्या मुद्रांक कागदपत्रावर करारनामा केल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येईल.

१६. कोणतीही निविदा मंजूर करणेचा अगर कोणतेही कारण न देता नाकारणेचा, निविदेतील अटी व शर्ती शिथिल करण्याचा ग्रामपंचायत विचुंबे यांचेकडे राहील.

१७. निविदेतील नमूद केलेल्या साहित्याचा दर मूल्यवर्धित कर तसेच इतर सर्व अनुवांशिक कर व शुल्कासह असावेत. सदरचे मूल्यवर्धित कर व इतर शासन खाती भरण्याची जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

१८. निविदा प्रक्रियेबाबत कोणतीही शंका/प्रश्न असल्यास त्या बाबत निविदा भरण्याच्या अंतिम तारखेपूर्वी किमान तीन दिवस अगोदर लेखी स्वरुपात विचारल्यास शंका निरसन करण्यात येईल.

१९. निविदांची निविदा फी (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) हे बँकेच्या RTGS / NEFT ऑनलाईन पद्धतीने भरावे .

२०.महाराष्ट्र शासन कडील व्यवसाय व विक्रेता नोंदणी प्रमाणपत्राची मुळ प्रत ,GST, पॅन कार्ड/ स्कॅन प्रत अपलोड करावी.

२१. तांत्रिक बाबी बघितल्यावरच निविदा उघडण्यात येईल.

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे**
**ता.पनवेल जिल्हा.रायगड.**

Signature Not Verified
Digitally signed by GANESH G GAIKAR
Date: 2026.05.19 15:27:43 IST
Location: Maharashtra-MH